महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन,पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यापीठ मार्ग, शिवाजीनगर पुणे - ४११०१६

दुरध्वनी क्र. ०२०-२५६७६८१८, २५५१९२०० Email:- principal.gppune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. शातंनिपु/विवि/महाडीबीटी सूचना/ २०२२/३१४८ दिनांक 11 JUL 2022

## सूचना

शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ मध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, https://mahadbtmahait.gov.in या संकेस्थळावर शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्याची **दिनांक ३१/०७/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.** तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी व ज्या विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत देण्यात आली आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांनी वरील संकेतस्थळावर आपला अर्ज भरावा.

तसेच SC प्रवर्गासाठी नवीन अर्ज/योजना निवडण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांनी योजना रदद करु नये. अर्ज भरण्याच्या दिनांक मध्ये मुदतवाढ देण्यात आली तर विद्यार्थ्यांनी महाडीबीटी संकेतस्थळावर पाहणे आवश्यक आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी वरील संकेतस्थळावर अर्ज भरला आहे. परंतू काही कागदपत्रे किंवा चूकीची माहिति भरल्यामुळे शिष्यवृत्तीचा अर्ज विद्यार्थ्यांना परत पाठविण्यात आला आहे. अशा विद्यार्थ्यांनी आपला शिष्यवृत्तीच्या अर्जात बदल करुन अर्ज ( Re_apply) परत भरावा. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी फी मध्ये सवलत देण्यात आली आहे अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा अर्ज वरील संकेतस्थळावर विहीत वेळेत न भरल्यास त्यांना देण्यात आलेली सवलत वसूल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सन २०२०-२१ मध्ये ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा अर्ज परत पाठविण्यात आला आहे. अशा विद्यार्थ्यांनी **दिनांक ३१/०७/२०२२ पर्यंत आपला शिष्यवृत्तीच्या अर्जात बदल करुन अर्ज (Re_apply) परत भरावा.**

11/7/2022

(डॉ. विठ्ठल श्री. बांदल)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे.

प्रत - १. सर्व विभाग प्रमुख, त्यांना कळविण्यात येते की, सदरील सूचना आपल्या विभागाच्या सूचना फलकावर लावण्यात यावी.

२. विभाग प्रमुख संगणक, त्यांना कळविण्यात येते की, सदरील सूचना दि.३१/०७/२०२२ पर्यंत संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

Scanned with CamScanner